लोकमत



# वानवडीत स्मृतिभ्रंश डे केअर केंद्र सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**वानवडी :** डिग्निटी फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या मार्फत पुण्यातील पहिले डेमेन्सिया (स्मृतिभ्रंश) डे केअर केंद्र वानवडी येथे उघडण्यात आले आहे. या केंद्राचा शुभारंभ डेमेन्सिया केअर सेंटरचे डॉ. इच्छापुरीया यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी डॉ. उषा सुतारीया, असीर रे, डॉ. रोहित भागवत उपस्थित होते. डॉ. इच्छापुरीया यांनी डेमेन्सिया होण्याची कारणे व त्यावरील उपाय याबद्दल ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला. स्मृतिभ्रंश होणे हा आजार ज्येष्ठ नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. या आजारावरील उपाय योग्यरीत्या व्हावेत यासाठी वानवडीमध्ये प्रथमच डिग्निटी फाउंडेशनकडून सोयीसुविधायुक्त अशा केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे. डॉ. सुजय जोशी यांनी केंद्रासंबंधी संपूर्ण माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सगुणा रामाप्रसाद यांनी केले. संस्थेचे पुणे येथील व्यवस्थापक किरण महांकाळे, निसार शेख व थॉमस कुरियन यांनी कार्यक्रम यशस्वी केला.